OIL & NATURAL GAS CORPORATION
(WOU) KARMACHARI SANGHTANA
AFFILIATED TO - PETROLIUM & GAS WORKERS' FEDERATION OF INDIA
Reg. No. (By - II - 8268)
Tel.: 022-26274102
Flat No.102, 1st Floor, Acme Hormony-I, Poonam Nagar, Off. JV Link Road, Andheri (E), Mumbai - 400 093.

ओ.एन.जी.सी. मुंबई परिक्षेत्रातील उरण,न्हावा,पनवेल व हेलीबेस येथे M/s Lifejet Cardiac Ambulance Services तर्फे 'रुग्णवाहिका' सेवेमध्ये कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणारे सर्व चालक व क्लिनर (एकूण २० कर्मचारी) पैकी न्हावा,पनवेल व हेलीबेस येथील कर्मचाऱ्यांचे २ महिन्याचे ( नोव्हेंबर व डिसेंबर २०२१) वेतन व उरण च्या कर्मचाऱ्यांचे ३ महिन्याचे (जानेवारी,फेब्रुवारी व मार्च २०२२) वेतन देण्यास M/s Lifejet Cardiac Ambulance Services चा कंत्राटदार टाळाटाळ करीत होता.

**थकीत वेतन मिळण्याच्या मागणीला न्याय मिळून देण्यासाठी, विश्वासाने सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी 'कर्मचारी संघटनेचे' सरचिटणीस - श्री.प्रदीप मयेकर साहेब यांची भेट घेतली व आपल्या सर्व समस्या श्री.प्रदीप मयेकर साहेबांना लेखी स्वरूपात कळविल्या.**

सदर समस्येबाबत श्री.प्रदीप मयेकर साहेबांनी तात्काळ ट्रान्सपोर्ट इन्चार्ज,HRO मुंबई, उरण प्रशासन,पनवेल प्रशासन,न्हावा प्रशासन,लॉजिस्टिक इन्चार्ज - मुंबई व कामगार आयुक्त RLC (CL) ह्यांच्या कडे थकीत वेतन मिळण्याच्या न्याय्य मागणीसाठी पाठपुरवठा चालू केला.

कर्मचाऱ्यांच्या २-३ महिन्याच्या थकीत वेतनाबाबत दि.११.१०.२०२१ रोजी RLC (CL) यांच्या समक्ष कर्मचारी संघटनेने केलेली मिटींग,**दि.२६.१०.२०२१ रोजी कर्मचारी संघटनेने दिलेले पत्र क्र.ONGC/KS/203/2021,दि.०७.०२.२०२२ रोजी कर्मचारी संघटनेने दिलेले पत्र क्र.ONGC/KS/11/2022 या सततच्या पाठपुरावठ्याची गंभीर दखल घेऊन ONGC प्रशासनाने आज दिनांक २०.०५.२०२२,शुक्रवार रोजी रुग्णवाहिका सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतानाचे धनादेश (Cheque) त्यांच्या नावे देण्यात आले.**

**सदर कार्य यशस्वीतेसाठी कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष - श्री.पराग कदम व संदीप गावडे यांचे विशेष सहकार्य, उपाध्यक्ष - श्री.मनोहर थळी,उप सरचिटणीस - श्री.नवनाथ टेमकर,पनवेल युनिटचे सचिव - श्री.प्रमोद मेस्त्री,उरण युनिटचे सचिव - श्री.उज्जेश तुपे व श्री.बाळकृष्ण काशीद,न्हावा युनिटचे सचिव - श्री.निलेश कोर्लेकर यांचा देखील मोलाचा सहभाग होता.**

**कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी धावून येणारी एकमेव संघटना म्हणजेच कर्मचारी संघटना.**

**प्रकाश दळवी,**
**अध्यक्ष,**
**ओ.एन.जी.सी. (डब्ल्यू.ओ.यु.) कर्मचारी संघटना.**





उरण





हेलीबेस








न्हावा







पनवेल